**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

**वर्ष ११, अंक १६(२)]** **शुक्रवार, जुलै ११, २०२५/आषाढ २०, शके १९४७** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००**

**असाधारण क्रमांक ८२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **११ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LVII OF 2025.**

A BILL

TO SUGGEST PUNISHMENT FOR INSULT TO RELIGIOUS LEADERS, HISTORICAL GREATS AND NATIONAL PERSONALITIES.

**धर्मगुरू, ऐतिहासिक महापुरुष आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांचा अपमान करणाऱ्यांना कठोर शिक्षा करण्याकरिता विधेयक.**

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी अधिनियम करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र धर्मगुरू, ऐतिहासिक महापुरुष आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांचा अपमान (प्रतिबंध आणि शिक्षा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

**२.** धर्मगुरू, ऐतिहासिक महापुरुष आणि राष्ट्रीय प्रतीकांविरुद्ध अपमानकारक किंवा आक्षेपार्ह वक्तव्ये करणे :—

जो कोणी पूज्य नेते आणि प्रतिष्ठीत व्यक्तींची बदनामी करण्याचा कट रचतो किंवा करण्याचा प्रयत्न करतो, प्रोत्साहन देतो किंवा जाणूनबुजून त्यांना मदत करतो, अशी व्यक्ती, पाच वर्षांपेक्षा कमी नसलेली परंतु आजीवन कारावासापर्यंत वाढवता येऊ शकते अशा कारावासाची शिक्षा आणि किमान पाच लाख रुपयांच्या दंडास पात्र असेल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

अलीकडच्या काळात विविध समाजमाध्यमांद्वारे व्यक्तींनी पूजनीय धर्मगुरू, ऐतिहासिक महापुरुष आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्वांविरुद्ध अपमानकारक किंवा आक्षेपार्ह विधानं करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या घटनांमुळे अनेकदा सार्वजनिक अशांतता, सामाजिक तणाव आणि काही वेळा हिंसक निदर्शनाच्या घटना घडल्या आहेत. यामुळे समाजात अशांतता निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ्य दिवसागणिक बिघडत चालले आहे.

सध्या भारतीय न्याय संहिताच्या अस्तित्वात असलेल्या काही कलमांतर्गत अशा अपमानांबद्दल शिक्षा आहेत, परंतु त्या अनेकदा या प्रकारच्या गुन्ह्यांच्या गंभीरतेला न्याय देण्यासाठी अपुऱ्या ठरतात. अशा कृत्यांपासून लोकांना परावृत्त करण्यासाठी कठोर प्रतिबंधांची आवश्यकता आहे. मोक्का कायद्यातील शिक्षांच्या धर्तीवर समकक्ष शिक्षेची तरतूद केल्यास पूजनीय व्यक्तिमत्त्वांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही अशी स्पष्ट भीती अशी कृत्ये तसेच गुन्हे करणाऱ्यांच्या मनात निर्माण होऊन त्यापासून परावृत्त होतील.

महाराष्ट्र हे विविध समाज, संस्कृती आणि धार्मिक श्रद्धा असलेले राज्य आहे. मागील काही वर्षांपासून आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे धार्मिक तणाव निर्माण होऊन सार्वजनिक शांततेला बाधा आली आहे. धार्मिक आणि ऐतिहासिक नेत्यांच्या पवित्रतेचे रक्षण करणे सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी अत्यावश्यक बनले आहे. हे विधेयक त्या गरजेची पूर्तता करण्याचे आणि अशा प्रकारच्या अपमानजनक कृत्यांना प्रभावीपणे रोखण्यासाठी आणि कठोर कायदेशीर तरतुदी करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १६ जून २०२५.

**रईस शेख,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ११ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.